CMYK

सुविचार

प्रश्न विचारणे ही ज्ञानाच्या शोधाची पहिली पायरी आहे.

दैनिक **आरंभ मराठी**

www.arambhmarathi.com



सातारा जिल्ह्यात पावसाची जोरदार बॅटिंग

पेज ४

■ दैनिक ■ धाराशिव ■ वर्ष 2 रे ■ अंक 128 ■ मंगळवार दि.17 जून 2025 ■ RNI NO -2023/90078 ■ पाने 04 ■ किंमत रू 5

# विरोधकांच्या लेखीही राष्ट्रवादी कॉंग्रेसला महत्व नाही; भाजप-शिवसेनेच्या विरोधात कॉंग्रेसचे निवेदन,राष्ट्रवादीचा उल्लेख टाळला

## सत्ताधारी दोन पक्षांमुळे नियोजन समितीचा निधी अडकल्याचा आरोप

आरंभ मराठी | धाराशिव

जिल्ह्यात काही वर्षापूर्वीपर्यंत क्रमांक एकवर असलेल्या राष्ट्रवादी काँग्रेसच्या वाट्याला आता टीका करण्याएवढेही महत्व उरले नाही का असा प्रश्न उपस्थित झाला आहे. कारण, सत्तेत असलेल्या आणि नसलेल्या राष्ट्रवादी काँग्रेसच्या दोन्ही गटांचे जिल्ह्यातील अस्तित्व शून्य झाल्याची चर्चा सुरू आहे. आता काँग्रेसनेही विकासकाम ानावरून सत्ताधारी भाजप-शिवसेनेवर टीका करताना राष्ट्रवादी काँग्रेसचा उल्लेखही टाळला आहे. एकीकडे जिल्ह्यातील शरद पवार गटाची राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी सार्वजनिक प्रश्नावर शांत असताना अजित पवार गटाच्या सत्ताधारी पक्षाचेही अस्तित्व दिसत नसल्याने खुद्द विरोधी पक्ष काँग्रेसनेही या पक्षाला बेदखल केल्याची चर्चा आहे. त्याचे झाले असे की, जिल्हा नियोजन समितीच्या कामांना ३ महिन्यापूर्वी स्थगिती देण्यात आली असून, यामुळे विकास ठप्प आहे. मात्र या कामांना स्थगिती दिल्यापासून महायुतीमध्ये अंतर्गत वादाला तोंड फुटले आहे. भाजपने शिवसेना पक्षाचे पालकमंत्री प्रताप सरनाईक यांच्यावर निधी वाटपावरून अप्रत्यक्ष निशाणा साधला आहे.आमदार राणा जगजितसिंह पाटील यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्याकडे सरनाईक यांची तक्रार केली होती. यानंतर निधीला स्थगिती देण्यात आली आहे. मात्र मंत्री नितेश राणे यांनी जिल्हा दौऱ्यावर आल्यानंतर यासंबंधी शिवसेनेला डिवचताना फडणवीस सगळ्यांचा बाप आहे, असे संबोधून नव्या वादाला तोंड फोडले होते.त्यावर संतापलेल्या सत्ताधारी शिवसेनेने राणे यांना प्रत्युत्तर दिले एवढेच नाही तर पालकमंत्री प्रताप सरनाईक यांनी मुख्यमंत्र्यांना दिलेल्या पत्राची प्रत माध्यमांना पुरवली. यात भाजप आमदार राणा पाटील यांच्याशी संपर्क साधून देखील त्यांनी प्रतिसाद दिला नसल्याचे दाखवून दिले. परिणामी यातून दोन्ही पक्षांनी अंतर्गत वादातून जिल्ह्याला कसे वेठीस धरले आहे,याचा जिल्ह्याला प्रत्यय आला. वास्तविक पाहता धाराशिव जिल्ह्याचा विकास ठप्प असताना दोन्ही राष्ट्रवादी काँग्रेसने आपली भूमिका स्पष्ट केलेली नाही.या पार्श्वभूमीवर काँग्रेसने सोमवारी जिल्हाधिकाऱ्यांना निवेदन दिले असून, यामध्ये सत्ताधारी भाजप आणि शिवसेनेच्या वादामुळे जिल्हा नियोजन समितीच्या कामांना ब्रेक लागल्याचे म्हटले आहे. या राजकीय पक्षांनी जिल्ह्याला वेठीस धरले आहे. त्यामुळे कामे ठप्प आहेत. त्यामुळे जिल्हा नियोजन समितीच्या कामांवरील स्थगिती उठवावी, धाराशिव शहरातील १४० कोटींच्या विकास कामांची तातडीने सुरुवात करावी आदी मागण्या



करण्यात आल्या आहेत.निवेदनावर कॉंग्रेसचे प्रशांत पाटील, अग्निवेश शिंदे, उमेश राजेनिंबाळकर, सय्यद खलील, राजाभाऊ शेरखाने,सिद्धार्थ बनसोडे, जावेद काझी आदींच्या स्वाक्षऱ्या आहेत.

## जिल्ह्यात राष्ट्रीय नेते, कामाचे काय..?

जिल्ह्यात राष्ट्रवादी काँग्रेसच्या दोन्ही गटाचे प्रादेशिक, राष्ट्रीय स्तरावर काम करणारे नेते आहेत.पक्षाचे जिल्ह्यात मजबूत नेटवर्क होते. मात्र, कोणत्याही पदाधिकाऱ्याकडून किंवा नेत्याकडून जिल्ह्यात गेल्या ६ महिन्यात दोन्ही गटाचा एकही मेळावा किंवा जिल्हास्तरावर मोठा कार्यक्रम आयोजित करण्यात आलेला नाही. अनेक पदाधिकारी वर्षांनुवर्षे पदे घेऊन मिरवतात, मात्र १०० कार्यकर्ते जमा करण्याएवढी ताकद या नेत्यांकडे नाही. केवळ निवडणुका आल्यानंतर पुढे येणारे पदाधिकारी पक्ष आणि श्रेष्ठीपासून वस्तुस्थिती किती दिवस लपवत ठेवणार,हा खरा प्रश्न आहे. जिल्ह्यात क्रमांक एकवर असलेल्या राष्ट्रवादी काँग्रेसला आता कार्यकर्ता आणि जनाधार उरलेला नाही. एवढेच नाही तर खुद्द विरोधातील काँग्रेसने नामोल्लेख टाळण्याएवढे महत्व राहू नये, अशी परिस्थिती निर्माण झाली आहे. शेतकरी कर्जमाफी, शेतमाल भावासह अन्य प्रश्न असताना शरद पवार गटाची राष्ट्रवादी देखील चिडीचूप असल्याने आश्चर्य व्यक्त होत आहे.

# तुळजापूर शहर विकास आराखड्यास शिवसेना शिंदे गटाचा विरोध

### शहरातील मागच्या बाजूला कामे होत असल्याचा आरोप



आरंभ मराठी | तुळजापूर

तुळजापूर शहरासाठी नुकताच राज्य सरकारने १८०० कोटींचा विकास आराखडा मंजूर केला आहे. मात्र याबाबत महायुतीतील घटक पक्ष असलेल्या शिवसेना शिंदे गटाने आक्षेप घेतला असून, अनेक कामे ही शहरातील पाठीमागच्या बाजूस होत असून यामुळे ही कामे मुख्य शहरात करण्याची मागणी शिंदे सेनेचे तालुकाध्यक्ष अमोल जाधव व शहराध्यक्ष बापूसाहेब भोसले यांनी पत्रकार परिषदेत केली. यावेळी बोलताना अमोल जाधव म्हणाले की, तुळजापूर शहरासाठी विकास आराखडा करताना सर्वांना विश्वासात घेऊन करणे गरजेचे असताना देखील फक्त कुणाच्यातरी आग्रहामुळे हा विकास शहरातील पाठीमागच्या बाजूस करण्यात येत आहे. शहरात अनेक ठिकाणी शासनाच्या मोक्याच्या ठिकाणी जागा ह्या पडून आहेत. त्या जागेवर ही विकास कामे केल्यास त्या जागा वापरात येणार आहेत. तसेच याबाबत उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे व पालकमंत्री प्रताप सरनाईक यांच्याशी देखील चर्चा करण्यात येणार असल्याचे जाधव यांनी सांगितले.यावेळी बोलताना शहराध्यक्ष बापूसाहेब भोसले म्हणाले की, शहरातील पाठीमागच्या बाजूस कामे झाल्याने अनेक गोरगरीब ज्यांचा उदरनिर्वाह मंदिराच्या जीवावर आहे त्यांच्यावर उपासमारीची वेळ येणार आहे. त्यामुळे ही कामे पाठीमागे करण्यात येऊ नये तसेच याबाबत भूमिका स्पष्ट न केल्यास शिवसेना स्टाईलने आंदोलन करण्याचा इशाराही यावेळी देण्यात आला. यावेळी उप शहरप्रमुख रमेश चिवचिवे, गणेश नेपते, मोहन भोसले, संभाजी नेपते उपस्थित होते.

# धरती आबा जनजाती ग्राम उत्कर्ष अभियानातजिल्ह्यातील ४ गावांचा समावेश

आरंभ मराठी | धाराशिव

आदिवासी समाजाच्या सर्वांगीण विकासासाठी केंद्र सरकारने सुरु केलेल्या प्रधानमंत्री धरती आबा जनजाती ग्राम उत्कर्ष अभियानात जिल्ह्यातील ४ गावांचा समावेश करण्यात आला आहे. ही योजना देशभरात २ ऑक्टोबर २०२४ रोजी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या हस्ते सुरु करण्यात आली असून, त्याचा उद्देश आदिवासी जमातींचा आर्थिक,सामाजिक आणि शैक्षणिक विकास करणे हा आहे. या अभियानांतर्गत राज्यातील ३२ जिल्ह्यांतील २१४ तालुक्यांमधील एकूण ४९७५ गावांचा समावेश करण्यात आला आहे. जिल्ह्यातील परांडा तालुक्यातील ३ व धाराशिव तालुक्यातील १ गाव अशी एकूण ४ गावे या अभियानासाठी निवडण्यात आली आहेत.या अभियानाची प्रभावी अंमलबजावणी करण्यासाठी समित्यांची स्थापना करण्यात आली आहे. १५ ते ३० जून या कालावधीत संबंधित गावांमध्ये जनजागृती मोहिम राबविण्यात येणार आहे. जिल्हाधिकारी यांच्या मार्गदर्शनानुसार सर्व संबंधित विभागांना सक्रिय सहभागाचे निर्देश देण्यात आले आहेत.या मोहिमेद्वारे गावकऱ्यांना आधार कार्ड,आयुष्मान भारत कार्ड,जात प्रमाणपत्र,पीएम किसान योजना,जनधन खाते उघडणे,ई-सेवा सुविधा यांसारख्या सेवांचा लाभ मिळणार आहे. तसेच सिकलसेल आजाराविषयी जनजागृती,आरोग्य तपासणी शिबिरे, पोषण,अन्न व नागरी पुरवठा,पंचायत राज,कृषी,सामाजिक न्याय,महसूल व ग्रामीण विकास विभागांच्या योजना या माध्यमातून लाभार्थ्यांपर्यंत पोहोचविण्यात येणार आहेत. या उपक्रमामुळे आदिवासी भागात सेवा व पायाभूत सुविधा पोहचतील वंचित समाजघटकांचा विकास साधता येईल,असे मत एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प अधिकारी सागर नन्नवरे यांनी केले आहे.

# पत्नी आणि दोन वर्षाच्या मुलाला विष देऊन तरुणाची आत्महत्या

### बावी येथील घटनेने हळहळ, पोलिसांनी दोघांचेही मोबाईल घेतले ताब्यात

आरंभ मराठी | धाराशिव

कर्जबाजारीपणाच्या गर्तेत अडकलेल्या तरुणाने पत्नी आणि दोन वर्षाच्या मुलाला विष पाजून गळफास घेऊन आत्महत्या केली. सोमवारी सकाळी ११ वाजता हा प्रकार उघडकीस आला. धाराशिव तालुक्यातील बावी येथे घडलेल्या या घटनेने हळहळ व्यक्त होत आहे.दरम्यान, ऑनलाइन गेम खेळात पैसे गेल्याने कर्जबाजारीपणातून आणि त्यानंतर सावकाराकडून घेतलेल्या पैशाची परतफेड करण्यासाठी असमर्थ ठरल्याने तरुणाने स्वतः सह कुटुंबाला संपवल्याची चर्चा सुरू आहे. हा प्रकार ऑनलाइन खेळात पैसे गेल्याने कर्जबाजारीपणातून झाल्याचे सांगण्यात येत असले तरी सावकारीचा किंवा अन्य काही प्रकार आहे का, याबाबतचे नेमके कारण समोर आलेले नसून पोलिसांनी तपासासाठी पती - पत्नीचे मोबाईल ताब्यात घेतले आहेत. लक्ष्मण मारुती जाधव, असे आत्महत्या करून कुटुंबाला संपवलेल्या तरुणाचे नाव आहे. जाधव हा ट्रॅक्टर चालक म्हणून काम करत होता. त्याने ३ वर्षांपूर्वी गावातील तेजस्विनी (२१)




यांच्याशी प्रेम विवाह केला होता.त्यांना दोन वर्षाचा मुलगा होता.गावकऱ्यांच्या सांगण्यानुसार लक्ष्मण जाधव याने कर्जबाजारीपणातून स्वतःच्या मालकीची एक एकर जमीन तसेच गावातील प्लॉटिंगची जागा विक्री केली होती. यानंतरही तो कर्जबाजारीपणातून मुक्त झाला नव्हता. त्यामुळे तो तणावात होता. दरम्यान, त्याने रविवारी रात्री पत्नी तेजस्विनी तसेच दोन वर्षाच्या मुलाला विष देऊन मारून त्यानंतर त्याने घरातच गळफास घेऊन आत्महत्या केली असावी.घराचा दरवाजा उघडला जात नसल्याने सकाळी ११ वाजेच्या सुमारास हा प्रकार गावकऱ्यांच्या लक्षात आला. त्यानंतर पोलिसांना बोलावण्यात आले. घटनास्थळी पोलीस अधीक्षक रितू खोखर यांच्यासह पोलिस अधिकारी दाखल झाले.या घटनेने गावात खळबळ उडाली आहे.दरम्यान, सायंकाळी ६ वाजेच्या सुमारास तिघांच्या मृतदेहावर अंत्यसंस्कार करण्यात आले.

# ५० लक्ष वृक्ष लागवडीचा संकल्प पूर्ण करण्यासाठी प्रशासन सज्ज

### एकाच दिवशी १५ लक्ष वृक्षांची लागवड करण्यासाठी विविध समित्या व पथकांची नेमणूक

आरंभ मराठी | धाराशिव

यंदाच्या सन २०२५ च्या पावसाळ्यात जिल्ह्यात ५० लक्ष वृक्षांची लागवड करण्याचा महत्त्वाकांक्षी उपक्रम राबविण्यात येणार आहे. यामध्ये जिल्ह्यातील ६२२ ग्रामपंचायती व १० नगरपालिका क्षेत्रांमधून लोकसहभागातून एकाच दिवशी १५ लक्षांहून अधिक वृक्ष लागवड व वृक्षसंवर्धन करण्यात येणार आहे. या उपक्रमासाठी सूक्ष्म नियोजन करण्यात आले असून, यशस्वी अंमलबजावणीसाठी जिल्हास्तरावर विविध समित्या व पथकांची स्थापना करण्यात आली आहे. या समित्यांमधील अधिकारी व कर्मचाऱ्यांना त्यांच्या जबाबदाऱ्या देण्यात आल्या असून, त्यांनी रोपण कालावधीत नेमून दिलेली कामे विहित वेळेत पार पाडण्याचे आदेश जिल्हाधिकारी पुजार यांनी दिले आहेत. यामध्ये जिल्हा नियंत्रण कक्षामध्ये जिल्हाधिकारी कीर्ती किरण पुजार, जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी, डॉ.मैनाक घोष, जिल्हा पोलीस अधीक्षक रितू खोकर, उपजिल्हाधिकारी (रोहयो) प्रवीण धरमकर, विभागीय वन अधिकारी,(प्रादेशिक) बी.ए.पोळ, विभागीय वनाधिकारी (सामाजिक वनीकरण) व्ही.ए.करे व जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी रवींद्र माने हे असणार आहेत. वृक्षारोपण व वृक्ष संवर्धन सनियंत्रण अधिकारी म्हणून अप्पर जिल्हाधिकारी ज्योती पाटील व जिल्हा परिषदेचे अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी विलास जाधव हे असणार आहेत.वृक्षारोपण व वृक्ष संवर्धन तालुकास्तरीय (शहरी भाग वळून) नोडल अधिकारी यांची नियुक्ती करण्यात



आली आहे. यामध्ये धाराशिव ग्रामीणसाठी उपजिल्हाधिकारी (भूसंपादन,मांजरा प्रकल्प) उदयसिंह भोसले, तुळजापूर ग्रामीणसाठी जिल्हा परिषदेच्या महिला व बाल विभागाचे जिल्हा प्रकल्प अधिकारी देवदत्त गिरी, उमरगा ग्रामीणसाठी उपमुख्य कार्यकारी अधिकारी (पंचायत) श्याम गोडभरले, भूम ग्रामीणसाठी उपमुख्य कार्यकारी अधिकारी ( नरेगा) आनंद मिरगणे,लोहारा ग्रामीणसाठी उपजिल्हाधिकारी (भूसंपादन) मध्यम प्रकल्प,परंडा ग्रामीणसाठी प्रकल्प संचालक (जलजीवन मिशन ) मनोज राऊत,कळंब ग्रामीणसाठी जिल्हा पुरवठा अधिकारी स्वाती शेंडे, वाशी ग्रामीणसाठी उपमुख्य कार्यकारी अधिकारी (सामान्य प्रशासन) सूर्यकांत भुजबळ तर नगरपालिका व नगरपंचायत स्तरीय नोडल अधिकारी यांची नियुक्ती करण्यात आली असून यामध्ये धाराशिव नगर पालिकेसाठी धाराशिव उपविभागीय अधिकारी ओंकार देशमुख, तुळजापूर न.प.साठी जि.प चे कृषी विकास अधिकारी प्रमोद राठोड, उमरगा नपसाठी उमरग्याचे उपविभागीय अधिकारी गणेश पवार, भूम नपसाठी उपविभागीय अधिकारी भूम वैशाली पाटील, वाशी नगरपंचायतसाठी कळंब उपविभागीय अधिकारी संजय पाटील, परंडा नपसाठी उपविभागीय कृषी अधिकारी,भूम विवेक गुडूप लोहारा नगर पंचायतसाठी धाराशिव उपविभागीय कृषी अधिकारी महादेव आसलकर, कळंब नपसाठी कळंब उपविभागीय अधिकारी संजय पाटील, नळदुर्ग नपसाठी जिल्हा सह. आयुक्त (नगर विकास प्रशासन) अजित डोके धाराशिव यांची तर मुरूम नगर पंचायतसाठी जिल्हाधिकारी कार्यालयातील तहसीलदार (संजय गांधी) ज्योती चव्हाण यांची नियुक्ती करण्यात आली आहे. तालुकास्तरीय (शहरी भाग वगळून) सहाय्यक नोडल अधिकारी यांची नियुक्ती करण्यात आली आहे. धाराशिव, तुळजापूर, भूम, कळंब, उमरगा, लोहारा, वाशी,परंडा यासाठी संबंधित तालुक्याचे तहसीलदार, गट विकास अधिकारी व तालुका कृषी अधिकारी हे काम पाहणार आहेत.तर नगरपालिका व नगरपंचायत स्तरीय नोडल अधिकारी म्हणून संबंधित नगरपालीका व नगरपंचायतची मुख्यधिकारी काम पाहणार आहेत. वृक्षारोपणासाठी वन क्षेत्रपाल बी.एम. तळेकर व वनपाल शहाजी देशमुख हे मार्गदर्शन करणार आहेत. वृक्षारोपणासाठी साहित्याचा पुरवठा करणारे पथकाचीही नेमणूक करण्यात आली असून यामध्ये धाराशिव वनपरिक्षेत्र अधिकारी पचरंडे व भुमचे वनपरिक्षेत्र अधिकारी (प्रादेशिक) श्री.कुटे हे आवश्यकतेनुसार साहित्याचा पुरवठा करणार आहे.यामध्ये प्रचार प्रसिद्धीचे काम जिल्हा माहिती अधिकारी व विभागीय वनाधिकारी (सामाजिक वनीकरण) धाराशिव यांच्याकडे असणार आहे.वृक्षारोपण स्थळांची लागवड पूर्व कामे (मशागत) पथक यामध्ये प्रकल्प संचालक (आत्मा) श्री.व्ही.एन.मिसाळ यांची पथक प्रमुख म्हणून नेमणूक करण्यात आली आहे. भूम, कळंब, लोहारा, उमरगा, धाराशिव, परंडा,तुळजापूर व वाशी या तालुक्यांसाठी संबंधित तालुक्याचे तहसीलदार, गटविकास अधिकारी व तालुका कृषी अधिकारी हे काम पाहणार आहेत.गिनीज वर्ल्ड रेकॉर्डसाठी नोंदणी ते वृक्षारोपण दिवशीपर्यंतचे सर्व कामकाज पाहण्याची जबाबदारी विभागीय वन अधिकारी (सामाजिक वनीकरण) व्ही.के.करे, तहसीलदार (महसूल) अभिजित जगताप,नायब तहसीलदार (रोहयो) कांचन जाधव ह्या असतील.

# शाळकरी मुलींचा अपघात: छोटा हत्ती वाहनाची धडक, दोघी गंभीर जखमी

### शाळेच्या पहिल्याच दिवशी दुर्घटना; संतप्त ग्रामस्थांचा रास्ता रोको







आरंभ मराठी | येणेगूर

शाळेच्या पहिल्याच दिवशी सोमवारी (ता.१६) रोजी येणेगुर येथे दुर्दैवी घटना घडली असून, सोलापूरहैदराबाद राष्ट्रीय महामार्गावर रस्ता ओलांडत असलेल्या दोन शाळकरी मुलींना टाटा कंपनीच्या छोटा हत्ती वाहनाने जोरदार धडक दिली. या अपघातात दोघीही मुली गंभीर जखमी झाल्या आहेत. इयत्ता १० वी व ८ वीत शिकत असलेल्या रेणुका स्वामी व गौरी स्वामी अशी या जखमी मुलींची नावे असून, त्या येणेगूर परिसरातील रहिवासी आहेत. सोमवारी सकाळी शाळा गाठत असताना उमरगा येथून नळदुर्गकडे जाणाऱ्या छोटा हत्तीने (एमएच १२-४०२९) त्यांना रस्त्यावर धडक दिली. अपघातानंतर दोघींना तत्काळ येणेगूर ग्रामीण रुग्णालयात प्राथमिक उपचारासाठी दाखल करण्यात आले. पुढे त्यांना उमरगा येथील उपजिल्हा रुग्णालयात हलविण्यात आले. दोघींनाही फ्रॅक्चर व गंभीर दुखापती झाल्याचे निष्पन्न झाल्याने, पुढील उपचारासाठी त्यांना लातूर येथे हलवण्यात आले आहे. या दुर्घटनेनंतर संतप्त ग्रामस्थांनी रस्त्यावर रास्ता रोको करत प्रशासनाचा निषेध व्यक्त केला. जवळपास अर्धा तास महामार्गावरील वाहतूक ठप्प झाली होती. मुरुम पोलीस ठाण्याचे अधिकारी व कर्मचारी तातडीने घटनास्थळी दाखल झाले असून, नागरिकांशी चर्चा करून आंदोलन शांत करण्यात आले. ग्रामस्थांनी यावेळी सांगितले की, ''या ठिकाणी पूर्वीही शाळकरी विद्यार्थ्यांच्या अपघाताच्या घटना घडल्या आहेत. रस्ता पूर्ण न झाल्याने व पादचारी पुलाचा अभाव असल्याने अपघातांचे प्रमाण वाढले आहे. प्रशासनाने वेळीच उपाययोजना कराव्यात.'' या घटनेप्रकरणी पोलिसांनी वाहतूक व अपघातासंदर्भातील सर्व बाबींची नोंद घेतली असून पुढील तपास सुरू आहे.

CMYK

# संकल्प ते सिद्धी अभियानातून धाराशिव भाजपचा जनता दरबार

## नागरिकांच्या २२८ तक्रारी; यंत्रणांशी समन्वय साधून तक्रारींचे निवारण

आरंभ मराठी | धाराशिव

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाखालील केंद्र सरकारच्या ११ वर्षांच्या यशस्वी कार्यकाळानिमित्त भारतीय जनता पक्षातर्फे 'संकल्प ते सिद्धी' अभियान राबवले जात असून, त्याचाच एक भाग म्हणून रविवारी, १५ जून रोजी धाराशिव जिल्ह्यात विविध ठिकाणी 'जनता दरबार'चे आयोजन करण्यात आले होते. या उपक्रमातून नागरिकांच्या अडचणी आणि समस्या थेट ऐकून त्यांचे शासकीय आणि पक्ष पातळीवर निराकरण करण्याचा भाजपचा मानस आहे. माजी आमदार सुजितसिंह ठाकूर यांच्या मार्गदर्शनाखाली व



आमदार राणाजगजितसिंह पाटील यांच्या नेतृत्वात झालेल्या या उपक्रमात नागरिकांचा मोठा सहभाग दिसून आला. धाराशिव, तुळजापूर आणि कळंब या तालुक्यांमध्ये एकूण सहा ठिकाणी हे दरबार आयोजित करण्यात आले होते. या दरम्यान २२८ लेखी तक्रारी आल्या होत्या तर याच वेळ आलेल्या अनेक तक्रारींचा निपटारा जागेवरच करण्यात आला. घरकुल हप्त्यांचे थकबाकी प्रकरण, नळजोडणी, ग्रामपंचायतीशी संबंधित तक्रारी, वीज, रस्ते अशा स्थानिक स्वरूपाच्या अनेक समस्यांवर संबंधित यंत्रणांशी समन्वय साधून तात्काळ निर्णय घेण्यात आले. काही बाबी पुढील कार्यवाहीसाठी नोंदवून घेतल्या गेल्या. या उपक्रमासंदर्भात भाजपा जिल्हाध्यक्ष दत्ताभाऊ कुलकर्णी म्हणाले की, ''जनतेने आता अडचणींसाठी तालुक्याच्या किंवा जिल्हा कार्यालयाच्या फेऱ्या मारण्याची गरज उरणार नाही. भाजपा थेट गावात जाऊन प्रश्न सम जून घेत आहे आणि तिथेच उपायही शोधत आहे. हाच आमचा 'जनतेशी थेट संवाद' ठेवण्याचा प्रयत्न आहे.'

### या ठिकाणी घेण्यात आले जनता दरबार

कळंब तालुक्यात ईटकुर येथे नेताजी पाटील यांच्या प्रमुख उपस्थितीत आणि अरुण चौधरी यांच्या अध्यक्षतेखाली दरबार झाला. शिराढोण येथे जिल्हा परिषद माजी अध्यक्षा अस्मिता कांबळे यांच्या उपस्थितीत व दत्ता साळुंखे यांच्या संयोजनात जनता दरबार कार्यक्रम पार पडला. धाराशिव तालुक्यातील ढोकी येथे माजी जि.प. सभापती ॲड. दत्तात्रय देवळकर यांच्या उपस्थितीत व अनिल भुतेकर यांच्या अध्यक्षतेखाली जनता दरबार पार पडला. कोंड येथे नितीन काळे यांच्या उपस्थितीत व निळकंठ पाटील यांच्या संयोजनात कार्यक्रम झाला. तुळजापूर तालुक्यातील काटगाव येथे ॲड. खंडेराव चौरे यांच्या उपस्थितीत व महादेव जाधव यांच्या संयोजनात दरबार झाला, तर नांदगाव येथे जिल्हाध्यक्ष दत्ताभाऊ कुलकर्णी यांच्या प्रमुख उपस्थितीत व रंजना राठोड यांच्या अध्यक्षतेखाली नागरिकांच्या समस्या ऐकल्या गेल्या. भाजपच्या या दरबारांमुळे गावागावातील सामान्य जनतेला आपल्या प्रश्नांसाठी थेट व्यासपीठ मिळाले असून, या उपक्रमातून 'संकल्प ते सिद्धी' हा उद्दिष्ट मार्गक्रमण करत असल्याचे दिसून येते.

# रुपामाता समूहाची नवीन शैक्षणिक वर्षाच्या तयारीसाठी शैक्षणिक आढावा बैठक



आरंभ मराठी | धाराशिव

शहरातील समर्थ नगर येथील समर्थ हॉटेलमध्ये रुपामाता शिक्षण संस्थेच्या अंतर्गत कार्यरत असलेल्या विविध शाळांची संयुक्त बैठक संस्थेचे अध्यक्ष ॲड. व्यंकट गुंड यांच्या अध्यक्षतेखाली पार पडली. या बैठकीस रुपामाता प्राथमिक विद्यालय धाराशिव, इरा इंटरनॅशनल स्कूल धाराशिव, रुपामाता माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालय, पाडोळी (आ) तसेच संत ज्ञानेश्वर माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालय, लासोना या शाळांचे मुख्याध्यापक, शिक्षक, क्लार्क व सर्व कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.नवीन शैक्षणिक वर्ष २०२५२६ ची व्यापक तयारी, शैक्षणिक गुणवत्ता वृद्धी, विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी नविन उपक्रम, शिक्षक प्रशिक्षण, तंत्रज्ञान वापर, तसेच शाळांतील शिस्त व नियोजन या बाबींवर सविस्तर चर्चा झाली.संस्था विद्यार्थ्यांचे भविष्य घडवण्यासाठी सदैव कटिबद्ध आहे आणि या बैठकीद्वारे शिक्षण क्षेत्रात गुणवत्तापूर्ण कार्य करण्याचा संकल्प पुन्हा एकदा दृढ करण्यात आल्याची माहिती ॲड. व्यंकट गुंडयांनीकेली.

# शिवाजी विद्यापीठात १९ ते २१ जूनपासून होणार आंतरराष्ट्रीय परिषद; देश-विदेशांतील १५० हून अधिक संख्या शास्त्रज्ञांचा सहभाग

आरंभ मराठी | कोल्हापूर,



शिवाजी विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. दिगंबर शिर्के यांच्या संख्याशास्त्रातील योगदानाच्या सन्मानार्थ विद्यापीठाच्या संख्याशास्त्र अधिविभागाच्या वतीने दिनांक १९ ते २१ जून या कालावधीत 'ॲडव्हान्सेस इन स्टॅटिस्टिकल मेथड्स, डेटा सायन्स अँड ऑफिशियल स्टॅटिस्टिक्स' या विषयावर आंतरराष्ट्रीय परिषदेचे आयोजन करण्यात आले आहे. परिषदेत देशविदेशांतील १५०हून अधिक संख्याशास्त्रज्ञ सहभागी होणार असून ज्येष्ठ सामाजिक कार्यकर्ते डॉ. अभय बंग यांच्या बीजभाषणाने परिषदेस प्रारंभ होईल. ही माहिती संख्याशास्त्र अधिविभागाचे प्रमुख डॉ. शशीभूषण म हाडिक यांनी दिली आहे.डॉ. दिगंबर शिर्के १९९० साली संख्याशास्त्र अधिविभागात अधिव्याख्याता म्हणून रुजू झाले. गेल्या तीन दशकांमध्ये त्यांनी अधिविभागातील अध्यापनाबरोबरच संख्याशास्त्रातील मूलभूत संशोधनामध्ये जागतिक कामगिरी नोंदविली आहे. आघाडीच्या वित्तीय संस्थांनी प्रायोजित केलेले नऊ संशोधन प्रकल्प त्यांनी पूर्ण केले आहेत. त्यांच्या मार्गदर्शनाखाली १६ विद्यार्थ्यांनी पीएच.डी. पदवी प्राप्त केली आहे. त्यांचे अनेक विद्यार्थी शैक्षणिक, औद्योगिक आणि प्रशासकीय क्षेत्रात उच्च पदांवर कार्यरत आहेत.डॉ. शिर्के हे भारताच्या आघाडीच्या संख्याशास्त्रज्ञांमध्ये गणले जातात. ते 'इंडियन सोसायटी फॉर प्रोबॅबिलिटी अँड स्टॅटिस्टिक्स'चे फेलो आहेत. संख्याशास्त्र अधिविभागाचे प्रमुख म्हणून नऊ वर्षे जबाबदारी सांभाळत असताना त्यांनी विद्यार्थ्यांना संख्याशास्त्राधिष्ठित उद्योगांत संधी मिळाव्यात, या हेतूने एम.एससी. (अप्लाइड स्टॅटिस्टिक्स अँड इन्फॉर्मेटिक्स) हा अभ्यासक्रम सुरू केला. विभागातील संगणक प्रयोगशाळेचे आधुनिकीकरण घडवून आणण्यात त्यांचा मोलाचा वाटा राहिला. संख्याशास्त्रातील नवे प्रवाह अभ्यासक्रमात समाविष्ट व्हावेत, यासाठी त्यांनी सातत्याने प्रयत्न केले. त्यांच्या पुढाकारातून विभागातील विद्यार्थ्यांसाठी विविध शिष्यवृत्ती योजना राबवण्यात आल्या. शिवाजी विद्यापीठाशी संलग्नित महाविद्यालयांमध्ये त्यांनी संख्याशास्त्र विषयावर लोकप्रिय व्याख्याने दिली. त्याचप्रम ाणे, अमेरिका, पोर्तुगाल, जर्मनी, सिंगापूर, स्वित्झर्लंड, मलेशिया, थायलंड, नेदरलँड्स या देशांतील विद्यापीठांना भेटी देऊन संशोधनपर व्याख्याने दिली. आपले शैक्षणिक व संशोधनात्मक काम करत असतानाच त्यांनी कोल्हापूर परिसरातील विविध उद्योगांसाठी संख्याशास्त्रीय सल्लागार म्हणूनही काम केले. तसेच, त्यांच्यासाठी विविध प्रशिक्षण कार्यक्रमांचे आयोजन केले.कारकीर्दीच्या सुरुवातीपासूनच त्यांनी विद्यापीठात विविध प्रशासकीय जबाबदाऱ्या सांभाळल्या. विद्यार्थी वसतिगृहाच्या अधीक्षक पदापासून ते कुलसचिव, रुसा समन्वयक आणि पुढे प्र-कुलगुरू व कुलगुरू ही पदे भूषविली. अधिसभा, विद्यापरिषद, व्यवस्थापन परिषद अशा विविध अधिकार मंडळांवर त्यांनी प्रभावी कामगिरी बजावली.डॉ. शिर्के यांच्या संख्याशास्त्रातील या योगदानाचा गौरव करण्याच्या हेतूने या आंतरराष्ट्रीय परिषदेचे आयोजन करण्यात आले आहे. ज्येष्ठ वैद्यकीय संशोधक व सामाजिक कार्यकर्ते डॉ. अभय बंग हे परिषदेचे बीजभाषण करणार आहेत. परिषदेसाठी अमेरिका, मलेशिया, आणि ग्रीस येथील नामवंत संख्याशास्त्रज्ञांना निमंत्रित वक्ते म्हणून पाचारण करण्यात आले आहे. देशातील विविध विद्यापीठांमधूनही १५० हून अधिक संख्याशास्त्रज्ञ परिषदेत सहभागी होणार आहेत. ३० ज्येष्ठ भारतीय संख्याशास्त्रज्ञ, भारतीय सांख्यिकी सेवेतील पाच अधिकारी, रिझर्व बँक ऑफ इंडिया मधील दोन अधिकारीही सहभागी होणार आहेत.ही परिषद मिनिस्ट्री ऑफ स्टॅटिस्टिक्स अँड प्रोग्राम इम्प्लिमेंटेशन (भारत सरकार), रिझर्व बँक ऑफ इंडिया, नॅशनल बोर्ड फॉर हायर मॅथेमॅटिक्स, आणि अनुसंधान नॅशनल रिसर्च फाउंडेशन यांच्या वित्तीय सहाय्याद्वारे आयोजित करण्यातआलीआहे.

# तेर येथील जिल्हा परिषद केंद्रीय शाळेत विद्यार्थ्यांना पहिल्याच दिवशी पुस्तकांचे वाटप



आरंभ मराठी | तेर

जिल्हा परिषद केंद्रीय प्राथमिक शाळेत नवोदित विद्यार्थ्यांना गुलाब पुष्प देऊन त्यांचे स्वागत करण्यात आले. सोम वारी (दि.१५) शाळेचा पहिला दिवस असल्याने विद्यार्थ्यांमध्ये आनंदाचे वातावरण दिसून आले. शासनाच्या धोरणानुसार शाळेच्या पहिल्याच दिवशी केंद्रीय शाळेतील विद्यार्थ्यांना गणवेश व पुस्तके ,शूज, सॉक्स वाटप करण्यात आले. यावेळी विद्यार्थ्यांना गुलाब पुष्प व गोड पदार्थ देऊन त्यांचे स्वागत करण्यात आले. यावेळी मुख्याध्यापक गोरोबा पाडूळे, शिक्षक धनंजय थोडसरे, नवनाथ चंदनशिवे, अनिता पांढरे, सुनिता माने, सविता राठोड, नुसरत अन्सारी, बाळासाहेब कानडे, शाळा व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष राम कोळी यांच्यासह समितीच्या सदस्यांनी विद्यार्थ्यांचे स्वागत केले.



# पीएमश्री जि.प.उर्दू शाळेत प्रवेशोत्सव साजरा

पीएमश्री जिल्हा परिषद उर्दू शाळेत प्रवेशोत्सव मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला. या कार्यक्रमात विद्यार्थ्यांसह पालक , शाळा व्यवस्थापन समितीचे सदस्य अर्शद मुलानी आणि सर्व शिक्षक वृंद उपस्थित होते. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी शाळेचे मुख्याध्यापक तय्यबअली शहा होते. या कार्यक्रमात इयत्ता पहिली मध्ये नवीन प्रवेश घेतलेल्या विद्यार्थ्यांना पुष्पगुच्छ, पुस्तके, गणवेश, बूट आणि पायमोजे देऊन स्वागत करण्यात आले. विद्यार्थ्यांसह त्यांच्या पालकांचाही पुष्पगुच्छ देऊन सत्कार करण्यात आला. शाळेच्या पहिल्या दिवशी विद्यार्थ्यांना मिष्ठान्न स्वरूपात मोतीचूर लाडू वाटप करण्यात आले. यावेळी गुणवंत विद्यार्थ्यांचा पुष्पहार देऊन सत्कार करण्यात आला.

# भाई उद्धवराव पाटील प्रशालेत चैतन्यमय वातावरणात प्रवेशोत्सव साजरा

आरंभ मराठी | धाराशिव

उन्हाळी दीर्घ सुट्टीनंतर भाई उद्धवराव पाटील प्रशाला, धाराशिव येथे सोमवारी नविन शैक्षणिक वर्षाची उत्साहात सुरुवात झाली. या निमित्ताने शाळेमध्ये प्रवेशोत्सवाचे आयोजन करण्यात आले होते. नवागत विद्यार्थ्यांचे मन:पूर्वक स्वागत करण्यात आले. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी नवनियुक्त मुख्याध्यापक अमोल घोगरे हे होते. कार्यक्रमास माजी नगरसेवक अभिजीत काकडे, नगरसेविका श्रीमती राणी दाजीप्पा पवार तसेच सामाजिक कार्यकर्ते दाजीप्पा पवार उपस्थित होते. कार्यक्रमाची सुरुवात प्रतिमापूजनाने करण्यात आली. नवागत विद्यार्थ्यांचे पुष्प देवून स्वागत करण्यात आले. इ. ५ वी ते ८ वीच्या विद्यार्थ्यांना म ोफत पाठ्यपुस्तकांचे वितरण मान्यवरांच्या शुभहस्ते करण्यात आले. या प्रसंगी मार्गदर्शन करताना दाजीप्पा पवार म्हणाले, ''विद्यार्थ्यांनी नवीन शैक्षणिक वर्षात अभ्यासाला प्राधान्य देऊन स्वतः ची व शाळेची गुणवत्ता उंचावावी''मुख्याध्यापक अमोल घोगरे म्हणाले की, ''विद्यार्थ्यांच्या गुणात्म क विकासावर भर देण्यात येईल तसेच विशेष लक्ष स्पर्धा परीक्षेच्या स्पर्धा परीक्षेच्या माध्यमातून शिष्यवृत्तीधारक होण्याकडे भर असेल, असे बहुम ूल्य मार्गदर्शन केले. यावेळी विद्यार्थ्यांना खाऊ वाटप करण्यात आले. विद्यार्थ्यांना विशेष आकर्षण विविध रंगांची फुगे व सेल्फी पॉईंट होते. कार्यक्रम ात शाळेतील सर्व शिक्षक, शिक्षकेत्तर कर्मचारी, पालक व विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते. शालेय वातावरण चैतन्यमय, आनंदमय झाले होते.

# तुळजापूर विकास आराखड्याबाबत नाराज शहरावासियांची उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्याकडे तक्रार

आरंभ मराठी | तुळजापूर

तुळजापूर शहरात होत असलेल्या विकास आराखड्या बाबत शहरातील जाणता राजा युवा मंचच्या वतीने उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्याकडे निवेदन देऊन शहरातील विकास कामे ही मुख्य शहरात करण्याची म ागणी करण्यात आली आहे. यामध्ये निवेदनात म्हटले आहे की, महाराष्ट्र शासन तसेच केंद्र शासनाच्या माध्यमातून तीर्थक्षेत्र तुळजापूर येथे होत असलेल्या विकास आराखड्याबाबत समस्त तुळजापूरवासीयांचा आक्षेप असून, तुळजापूर शहरवासीयांमध्ये याबाबत तीव्र नाराजी होत आहे. शहरात होत असलेल्या विकास आराखड्यात बाबत यापूर्वी शहरवासीयांनी लेखी हरकती प्रशासनाकडे दिल्या आहेत. तुळजाभवानी मंदिर विकास



आराखडा हा शहरात न होता रामदारा तलाव परिसरात होत आहे. शहरात दोन ठिकाणी पार्किंग सोडली तर अनेक कामे ही मंदिराच्या पाठीमागे करण्याचा निर्णय मंदिर प्रशासन व विश्वासाने घेतला आहे असे दिसून येत आहे. श्री तुळजाभवानी मंदिर व तुळजापूर यामध्ये विभाजन करण्याचा हा प्रयत्न दिसून येत असून यामुळे सर्व तुळजापूर शहरवासी यांचे भवितव्य धोक्यात आले आहे. फक्त ठेकेदार मोठे होऊन शहराची उपजीविका बंद होणार आहे, तसेच यापूर्वीच्या आंदोलनास केराची टोपली दाखवून सक्तीने निर्णय घेण्यात येत आहेत. तरी याबाबत हा विकास आराखडा शहरवासीयांच्या मतांचा विचार करून शहरातच करावा अशी मागणी या निवेदनाद्वारे करण्यात आली आहे. या निवेदनावर सुदर्शन वाघमारे, अभिजीत कुतवळ, नागेश किवडे, शुभम खोले, सागर मस्के, परीक्षित साळुंखे, प्रसाद प्रयाग यांच्या स्वाक्षरी आहेत.

# आळणी जिल्हा परिषद प्राथमिक शाळेत विद्यार्थ्यांचा प्रवेशोत्सव

## सजवलेल्या बैलगाडी व ट्रॅक्टरमधून नवागत विद्यार्थ्यांची गावातून मिरवणूक

आरंभ मराठी | धाराशिव

तालुक्यातील आळणी जिल्हा परिषद प्राथमिक शाळेत सोमवारी नवीन शैक्षणिक वर्षानिमित्त विद्यार्थ्यांचा प्रवेशोत्सव मोठ्या उत्साहात व पारंपरिक पद्धतीने साजरा करण्यात आला. नवागत विद्यार्थ्यांचे स्वागत पारंपरिक पद्धतीने, ढोल-ताशांच्या गजरात आणि सजवलेल्या बैलगाडीतून मिरवणूक काढून करण्यात आले. यानिमित्ताने गावातून लेझीम ढोल आणि बँड पथकाच्या मधुर संगीताने फेरी काढण्यात आली.कार्यक्रमाची सुरुवात क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले यांच्या प्रतिम ेचे पूजन प्रमुख पाहुणे अध्यक्ष यांच्या उपस्थितीत करण्यात आले.या कार्यक्रमासाठी शिक्षणाधिकारी अशोक पाटील, उपशिक्षणाधिकारी दत्तप्रसाद जंगम, वरिष्ठ विस्तार अधिकारी मल्हारी माने,गावचे सरपंच प्रमोद वीर, शाळा व्यवस्थापन समितीच्या अध्यक्षा संजीवनी पौळ, उपाध्यक्षा अफसाना शेख, सदस्य निलेश देशमुख, सौ.अनिता पौळ, येडशी-बीटचे विस्तार अधिकारी प्रकाश पारवे, मुख्याध्यापक बशीर तांबोळी आदींसह शिक्षक, पालक व ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.




कार्यक्रमाची सुरुवात नवागत विद्यार्थ्यांच्या औक्षणाने करण्यात आली. त्यानंतर गोड पदार्थ जिलेबी गोड भात खाऊचे वाटप करून विद्यार्थ्यांचा आनंद द्विगुणित करण्यात आला. नव्या शैक्षणिक जीवनात पहिले पाऊल ठेवणाऱ्या मुलांचा सन्मान म्हणून ''पहिले पाऊल'' उपक्रमही राबविण्यात आला. विद्यार्थ्यांना गावच्या सरपंचांसह शाळा समितीच्या सदस्यांच्या हस्ते प्रवेशपत्र, नवीन गणवेश आणि पाठ्यपुस्तकांचे वाटप करण्यात आले. तसेच फुल देऊन प्रत्येकाचे स्वागत करण्यात आले. शाळेच्या पहिल्या दिवशी शाळेतील २७० विद्यार्थ्यांना सरपंच प्रमोद वीर यांच्या वतीने वह्यांचे वाटप करण्यात आले.

# ए.पी. स्कूलमध्ये विद्यार्थ्यांचे स्वागत

आरंभ मराठी | धाराशिव

येथील ए.पी.स्कूल येथे शाळेच्या पहिल्या दिवशी संस्थेचे संस्थापक अशोकराव पवार व संस्थेचे अध्यक्ष अभिजीत पवार यांच्या हस्ते विद्यार्थ्यांचे फुल देऊन स्वागत करण्यात आले. अध्यक्ष पवार यांच्या हस्ते भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेचे पूजन करण्यात आले. विद्यार्थ्यांनी डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचा आदर्श डोळ्यासम ोर ठेवून शिक्षण घेतल्यास ते जीवनात नक्की यशस्वी होतील, असे आपल्या मार्गदर्शनपर भाषणात अध्यक्षांनी मत व्यक्त केले. शाळेच्या पहिल्या दिवशी विद्यार्थ्यांना मोफत पाठ्यपुस्तक तसेच जिलेबीचे वाटप करण्यात आले. यावेळी प्रशासन अधिकारी महेश इंगळे, अनुजा पवार, सचिन केंगार,आशा मुंडे, प्रांजली हूलवणे, स्वराली पाटील, स्नेहल पवार यांच्यासह विद्यार्थ्यांचे पालक बहुसंख्येने उपस्थित होते.

# भोसले हायस्कूलमध्ये नवागत विद्यार्थ्यांचे जल्लोषात स्वागत

आरंभ मराठी | धाराशिव

धाराशिव येथील श्रीपतराव भोसले हायस्कूलमध्ये इ ५ वी ते पुढे नवीन प्रवेशित विद्यार्थ्यांचे पुष्पगुच्छ व पाठयपुस्तक देऊन प्रशालेचे प्राचार्य नंदकुमार नन्नवरे व मान्यवरांच्या हस्ते स्वागत करण्यात आले. नवीन वर्ग, नवीन पाठयपुस्तक, नवीन मित्र या भारावलेल्या वातावरणात मुलांनी शाळेत प्रवेश केला. राष्ट्रगीत व राज्यगीतानंतर प्राचार्यांनी विदयार्थी, पर्यवेक्षक, शिक्षक , पालक यांना पुष्पगुच्छ देऊन शैक्षणिक वर्ष २०२५





२६ वर्षासाठी शुभेच्छा दिल्या. यावेळी उपमुख्याध्यापक प्रमोद कदम, पर्यवेक्षक यशवंत इंगळे , सुनील कोरडे, श्रीमती बी .बी . गुंड, राजेंद्र जाधव, निखील गोरे , धनंजय देशमुख सर्व शिक्षक शिक्षिका व शिक्षकेत्तर कर्मचारी, पालक उपस्थित होते.

हे पत्र मालक, मुद्रक, प्रकाशक,संपादक चंद्रसेन गोविंदराव देशमुख यांनी आदेश प्रिंटर्स, रामकृष्ण कॉलनी, गवळी वाडा, धाराशिव, ता. जि. धाराशिव येथे छापुन रामकृष्ण कॉलनी, गवळी वाडा, धाराशिव (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. (न्यायीक क्षेत्र धाराशिव ) संपादक श्री. चंद्रसेन गोविंदराव देशमुख. मो.नं. ९८२२५९३९८० RNI NO.- 2023/90078

दैनिक आरंभ मराठी

## विविध वृत्त

## मुरुड येथील जनता विद्या मंदिर प्रशालेमध्ये नवीन शैक्षणिक वर्षाची उत्साहात सुरुवात



आरंभ मराठी | मुरुड

मुरुड येथील जनता विद्या मंदिर प्रशालेमध्ये शैक्षणिक वर्ष २०२५-२६ ची सुरुवात अतिशय उत्साहात करण्यात आली. सोमवारी यंदाच्या शैक्षणिक वर्षाचा पहिला दिवस असल्याने उत्साहामध्ये विद्यार्थी प्रशालेमध्ये मोठ्या संख्येने उपस्थित होते. प्रातिनिधिक स्वरूपात प्रशालेचे मुख्याध्यापक डी. व्ही. जाधव यांनी विद्यार्थ्यांचे गुलाब पुष्प देऊन सत्कार केला. प्रवेशोत्सवाच्या निमित्ताने नवीन प्रवेशित झालेल्या विद्यार्थ्यांना त्या त्या वर्गाची पाठ्यपुस्तके देऊन त्यांचे स्वागत करण्यात आले. याप्रसंगी उपस्थित असलेल्या काही पालक प्रतिनिधींचा देखील सत्कार करण्यात आला. या कार्यक्रम प्रसंगी प्रशालेचे मुख्याध्यापक डी. व्ही. जाधव, ज्येष्ठ पर्यवेक्षक जी.पी.पिसाळ, अरुण पाटील, श्रीमती तनुजा कोष्टी यांच्यासह मोठ्या संख्येने सर्व शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी व विद्यार्थ्यांची उपस्थिती होती.

## कॅप्टन जोशी स्मारक विद्यालयात पुष्पगुच्छ व शैक्षणिक साहित्य देऊन विद्यार्थ्यांचे स्वागत



आरंभ मराठी | आलुर

उमरगा तालुक्यातील येणेगूर येथे सोमवारी (दि.१६) शैक्षणिक वर्षाच्या पहिल्या दिवशी नवागत विद्यार्थ्यांचे पुष्पगुच्छ देऊन स्वागत करण्यात आले. तसेच मोफत पाठ्यपुस्तक व शैक्षणिक साहित्याचे वाटप श्री परमहंस शिक्षण संस्थेचे सचिव बी ए बिराजदार, येणेगूरचे उपसरपंच बाबासाहेब गायकवाड, संस्थेचे अध्यक्ष देवराज बिराजदार, प्रशालेचे मुख्याध्यापक महेश हरके, ग्रामपंचायत सदस्य संदीप बिराजदा,र ग्रामपंचायत सदस्य संतोष मुदकण्णा, पालक प्रतिनिधी बालाजी धामशेट्टी, संचालक शंकर हुळमजगे, आनंदराज बिराजदार यांच्या हस्ते करण्यात आले. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन व आभार सांस्कृतिक विभाग प्रमुख गोपाळ गेडाम यांनी केले. या कार्यक्रमासाठी शिक्षक सौरभ उटगे, महेश खंडाळकर, अविनाश दुनगे, व्यंकट बिराजदार, प्रवीण स्वामी, चंद्रकांत बिराजदार, गोविंद मेडेबणे, कोमल कीर्तने, पार्वती जगताप, कालिंदी भाले, प्रदीप शिंदे, सुरेश जाधव, अप्पू मुदकण्णा, गणेश जोजन, सुप्रिया झिंगाडे सर्व शिक्षक शिक्षकेतर कर्मचारी आणि विद्यार्थी उपस्थित होते.

## गोवंशीय जनावरांची अवैध वाहतूक करणाऱ्या वाहनाची वृद्धाला धडक; वृद्ध गंभीर जखमी

आरंभ मराठी | भूम

गोवंशीय जनावरांची अवैधपणे वाहतूक करणाऱ्या वाहनाने भूम - गोलेगाव रोडवर एमआयडीसी शेजारी गोगाव येथील एका वृद्ध माणसाला धडक दिली. यामध्ये वृद्ध व्यक्ती गंभीर जखमी झाला. धडक दिलेल्या गाडीचा ड्रायव्हर गाडी तेथेच सोडून पसार झाला. त्यानंतर रोडवरून जाणाऱ्या व येणाऱ्या वाहनांनी अपघात स्थळी मोठी गर्दी केली होती. जखमी व्यक्तीला शासकीय गाडीतून भूम येथे दाखल करण्यात आले. एक्सीडेंट करून गाडीचा ड्रायव्हर मात्र पसार झाला. परंतु तो चालवत असलेली गाडी त्याला घटनास्थळीच सोडावी लागली. उपस्थित नागरिकांनी गाडी जवळ जाऊन पाहिले असता, त्या गाडीत पंधरा ते वीस लहान लहान वासरे आढळून आले. वासरांच्या तोंडाला चिकटपट्टी गुंडाळलेली होती तर त्यांचे चारही पाय बांधलेल्या अवस्थेत होते.हे पाहताच उपस्थित जमावाने गाडीमध्ये असलेल्या सर्व वासरांना बाहेर काढले व त्यांना नवजीवन दिले. सध्या भूम शहर व परिसरामध्ये गोतस्करीचा गोरख धंदा चालू असल्याचे जाणवते यावर प्रशासनाने वेळीच आळा घालणे गरजेचे आहे , अशी प्रतिक्रिया उपस्थित नागरिकांनी दिली.

## मुरुडेश्वर माध्यमिक विद्यालयात नवीन शैक्षणिक वर्षात विद्यार्थ्यांचे व शिक्षकांचे उत्साहात स्वागत



आरंभ मराठी | मुरुड

मुरुड येथील मुरुडेश्वर माध्यमिक विद्यालय, येथे शैक्षणिक वर्ष २०२५-२६ च्या पहिल्या दिवशी विद्यार्थ्यांचे स्वागत करण्यासाठी एक विशेष कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता . या कार्यक्रमात बी. एन. डोंगरे यांच्या हस्ते विद्यार्थ्यांचे औपचारिक स्वागत करण्यात आले. कार्यक्रमाला विद्यालयाचे मुख्याध्यापक उद्धव फेरे यांनी अध्यक्षस्थानी उपस्थित राहून मार्गदर्शन केले, तर बाळासाहेब डोंगरे प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते. कार्यक्रमाच्या सुरुवातीला विद्यार्थ्यांनी सांस्कृतिक कार्यक्रम सादर करून वातावरण उत्साहपूर्ण केले. बाळासाहेब डोंगरे यांनी आपल्या भाषणात विद्यार्थ्यांना नवीन शैक्षणि क वर्षात मेहनत, शिस्त आणि समर्पणाने यश मिळवण्याचा मोलाचा सल्ला दिला. तसेच, मुख्याध्यापक फेरे यांनी विद्यार्थ्यांना शिक्षणाचे महत्त्व आणि शाळेच्या नियमांचे पालन करण्याचे आवाहन केले. या कार्यक्रमाला शिक्षक, पालक आणि विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते. शैक्षणिक वर्षाच्या पहिल्या दिवशी हा कार्यक्रम विद्यार्थ्यांमध्ये उत्साह आणि प्रेरणा निर्माण करणारा ठरला. कार्यक्रमचे सूत्रसंचालन बनसोडे यांनी तर आभार प्रदर्शन झाडके मॅडम यांनी मानले. कार्यक्रमाला विद्यालयातील सहशिक्षक लाड , सव्वाशे , सगर व शिक्षकेतर कर्मचारी विकास गायकवाड, अश्विन खराडे, राजेंद्र गिरी व कुंदन सिंग तिवारी उपस्थित होते.

# 'आरंभ मराठी'च्या वृत्ताचा परिणाम: रखडलेल्या जलजीवन मिशन योजनेच्या कामाला गती

आरंभ मराठी | येरमाळा

मलकापूर येथील जलजीवन मिशन योजनेचे काम काही काळापासून रखडलेले होते. त्यामुळे नागरिकांच्या पाण्याच्या पाण्याचा गंभीर प्रश्न निर्माण झाला होता. याच प्रश्नाला घेऊन 'मलकापूर येथे जलजीवन मिशनचे काम दीड वर्षांपासून बारगळले' या शिर्षकाखाली दिनांक ६ जून रोजी बातमी दिली होती. मलकापुर येथील रखडलेल्या जलजीवन योजनेचे काम सुरू करण्यासाठी बातमी प्रकाशीत केली होती. त्याचाच इम्पॅक्ट म्हणून शासनाने बातमीची दखल घेत पाणी पुरवठा अधिकाऱ्यांनी कामाची पाहणी करून गुत्तेदारास सुचना करून लगेच कामास सुरुवात केली आहे.कळंब तालुक्यातील मलकापूर येथे जलजीवन योजनेचे काम गेल्या अनेक महिन्यांपासुन अर्धवट अवस्थेत होते. जनतेला शुद्ध व स्वच्छ पाणी पुरवठा व्हावा या हेतूने ही योजना शासनाने सुरू केली होती. परंतु, मुदत संपुन देखील मलकापूरवासियांना पिण्यासाठी पाणी मिळत नव्हते. यामुळे निराशा पदरी पडलेल्या ग्रामस्थांच्या समस्यांना वाचा फोडत दै. आरंभ मराठीने बातमी प्रसारीत केली. त्यानंतर दुसऱ्याच दिवशी बी.व्ही. ढवळे उपविभागीय अभियंता ग्रामीण पाणीपुरवठा जिल्हा परिषद उपविभाग कळंब यांनी गावात भेट देऊन व गुत्तेदारास समज देऊन काम सुरू करण्यास सांगितले. सध्या या योजनेचे काम सुरू असून ते प्रगतीपथावर आहे. रखडलेल्या या योजनेचे काम दै. आरंभ मराठी च्या बातमी नंतर सुरू झाल्यामुळे ग्रामस्थांमध्ये आनंदाचे वातावरण आहे.





दैनिक आरंभ मराठी
06 Jun 2025 - Page 4
epaper.arambhmarathi.com

मलकापूर गावातील जलजीवन मिशन योजनेचे काम दीड वर्षांपासून बारगळले

ग्रामपंचायत कार्यालयाच्या उदासीनतेमुळे गाव तहानले

काम पूर्ण न करताच कामाची बिले काढल्याचा ग्रामस्थांचा आरोप

संबंधित अधिकारी आणि गुत्तेदार यांच्यावर कारवाई व्हावी

काम पूर्ण न करताच बिले उचलली

रखडलेले काम पूर्ण करण्यासाठी नोटीस काढणार

### काम सुरू झाले, योजना लवकरच कार्यान्वित होईल

मलकापूर येथील जल जीवन मिशन योजनेतील कामावर बी.व्ही.ढवळे उपविभागीय अभियंता ग्रामीण पाणीपुरवठा जिल्हा परिषद उपविभाग कळंब यांनी पाहणी करून आवश्यक त्या सुचना दिल्या आहेत. त्यानुसार संबंधित ठेकेदार यांनी उर्वरित काम सुरु केले आहे. लवकरच ही योजना कार्यान्वित होईल.

-विशाल कदम ग्रामसेवक

## समता विद्यालयात विद्यार्थ्यांचे गुलाबपुष्प देऊन स्वागत





आरंभ मराठी | धाराशिव

धाराशिव शहरातील शिक्षक कॉलनीमधील मराठी कन्या प्रा.शाळा व समता माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालयात सोमवारी (दि.१६) नवीन शैक्षणिक वर्षामधील विद्यार्थ्यांचा प्रवेशोत्सव साजरा करण्यात आला. विद्यार्थ्यांचे स्वागत गुलाब पुष्प देऊन करण्यात आले. इयत्ता पहिली ली ते आठवी पर्यंतच्या विद्यार्थ्यांना मोफत पाठ्यपुस्तकांचे वाटप करण्यात आले. यावेळी संस्थेचे उपाध्यक्ष एम. आर. एडके, मुख्याध्यापिका श्रीमती एस.एम. एडके, वेदपाठक आर. एस., एस.एस. शिंदे तसेच इतर सर्व शिक्षकवृंद व कर्मचारी यांची प्रमुख उपस्थिती होती. यावेळी विद्यालयात वृक्षारोपण व विद्यार्थ्यांना खाऊचे वाटप करण्यात आले.

## तुगाव जिल्हा परिषद शाळेत प्रवेशोत्सव व वृक्षारोपण उत्साहात



आरंभ मराठी | धाराशिव

धाराशिव तालुक्यातील जिल्हा परिषद प्राथमिक शाळा तुगांव येथे सोमवारी (दि.१६) शैक्षणिक वर्ष २०२५-२०२६ साठी शाळेमध्ये प्रथमतः मान्यवरांच्या हस्ते सावित्रीबाई फुले यांच्या प्रतिमेचे पूजन करून प्रवेशित होणाऱ्या सर्व बालकांचे जिल्हा परिषद शाळा तुगांवच्या वतीने पुष्पगुछ व शालेय साहित्य देऊन स्वागत करण्यात आले. तसेच पुढील शैक्षणिक वर्षासाठी शुभेच्छा देण्यात आल्या. या प्रवेशोत्सवाचे औचित्य साधून वृक्षारोपणासह वृक्षसंवर्धन हे अत्यंत महत्त्वाचे आहे. हीच महत्त्वाची बाब लक्षात घेऊन शाळेच्या प्रांगणात मान्यवरांच्या हस्ते वृक्षारोपण करून वृक्ष संवर्धनाचा संदेश देण्यात आला. या कार्यक्रमाचे प्रमुख पाहुणे म्हणून भारत देवगुडे, विस्तार अधिकारी शिक्षण विभाग, जिल्हा परिषद धाराशिव तसेच तुगांवचे सरपंच किशोर शेंडगे, माजी सरपंच नंदकुमार भुतेकर, संचालक कृषी उत्पन्न बाजार समिती तथा मंडल अध्यक्ष अनिल भाऊ भुतेकर, तुगांव पोलीस पाटील श्रुतिका हाजगुडे यांच्या उपस्थितीमध्ये हा कार्यक्रम संपन्न झाला. याप्रसंगी शाळा व्यस्थापन समितीच्या उपाध्यक्षा, प्रिती हाजगुडे सदस्य, मीराताई शितोळे, संगीता भुतेकर, मंदाकिनी भुतेकर, सचिन लोमटे उपस्थित होते. शाळेचे मुख्याध्यापक प्रमोद अनपट, सहशिक्षक शिवदास चौगुले, बाहुबली नवले, दत्तात्रय पडवळ, नामदेव डुकरे, अमोल वैद्य, सुलभकुमार भगत, नवनाथ बचाटे उपस्थित होते. पालक प्रतिनिधी म्हणून विशाल शेंडगे, ज्ञानेश्वर हाजगुडे, दिपक भुतेकर, शक्तिश्वर सोनटक्के, दशरथ भुतेकर यांच्यासह विद्यार्थी पालक मोठ्या संख्येने उपस्थित होते. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन सुलभ कुमार भगत यांनी केले तर उपस्थितांचे आभार शिवदास चौगुले यांनी मानले.

# कळंब शहरात नागरिकांचे आरोग्य धोक्यात; मुलभूत सुविधांचा बोजवारा

## राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे नगरपालिकेला निवेदन

आरंभ मराठी | कळंब



कळंब शहरात स्वच्छता मोहिम राबवून मुलभूत सुविधा तात्काळ देण्याची मागणी राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीच्या वतीने निवेदनाद्वारे करण्यात आली आहे. दिलेल्या निवेदनात असे म्हंटले आहे की, कळंब शहरात गेल्या अनेक महिन्यांपासुन कळंब नगर पालिकेने स्वच्छता मोहिम राबविलेली नाही. त्यामुळे कळंब शहरातील अनेक भागांतील नाल्या, गटारी घाण पाण्याने तुंबलेली असुन त्यांची दुर्गंधी पसरलेली आहे. तसेच डेंगू डांसाची पैदास वाढलेली आहे. त्यामुळे नागरिकांच्या आरोग्याला धोका निर्माण झालेला आहे. पावसाळा सुरु होण्यापुर्वीच सर्व नाल्या, गटारे स्वच्छता करुन घेणे गरजेचे होते पण ते केलेले नाही. सध्या पावसाळा सुरु झालेला असुन गटारांत पाणी तुंबुन घरात घुसत आहे. तसेच डासांची पैदास वाढुन नागरिक आजारी पडत आहेत व उग्र वासामुळे दुर्गंधी पसरलेली आहे. तसेच शहरातील विविध ठिकाणी स्ट्रेट लाईट देखील बंद आहेत. त्यामुळे चोऱ्यांचे प्रमाण वाढलेले आहे. तसेच संध्याकाळी नागरिकांना घराबाहेर पडणे देखील धोक्याचे झालेले आहे. कळंब शहरातील नागरीकांकडून तात्काळ स्वच्छता मोहिम राबवण्यासाठी मागणी होत आहे. यापूर्वी वारंवार निवेदन देऊन देखील प्रशासनाने दुर्लक्ष केलेले आहे. तात्काळ स्वच्छता मोहिम राबविण्यात यावी व मुलभूत सुविधांचा लाभ नागरिकांना देण्यात यावा या मागण्याचे निवेदन यावेळी देण्यात आले. नगरपालिकेने तात्काळ स्वच्छता मोहिम राबवली नाही, तर राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी अजित पवार पक्षामार्फत तीव्र आंदोलन आंदोलन करण्यात येणार असून, आठ दिवसांच्या आत कळंब न.प. ने स्वच्छता मोहिम राबविली नाही तर संबंधीत अधिकाऱ्यांच्या तोंडाला काळे फासुन, गाढवावर बसवून मिरवणुक काढण्यात येईल असा ईशारा निवेदनाद्वारे देण्यात आला असुन यावर राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी चे जिल्हा उपाध्यक्ष राहुल हौसलमल ,आकाश बनसोडे, अमर गोरे, श्रेयश धावारे आदींच्या स्वाक्षऱ्या आहेत.

## तलमोड येथील शाळेत नवागत विद्यार्थ्यांचे पाठ्यपुस्तके व पुष्पगुच्छ देऊन स्वागत

आरंभ मराठी | उमरगा





उमरगा तालुक्यातील तलमोड येथील श्री. छत्रपती शिवाजी विद्यालयात नव्याने प्रवेश घेतलेल्या इयत्ता आठवीच्या विद्यार्थ्यांना पाठयपुस्तके वाटप करण्यात आली तसेच सर्व विद्यार्थ्यांचे गुलाब पुष्प देवून स्वागत करण्यात आले. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी सरपंच उषा (ताई) दिलीप मोरे या होत्या. तर प्रमुख धनुबाई माधव मोरे,कावेरी परुतप्पा कलशेट्टी, सुनंदा वामन येवते आदी उपस्थित होते. प्रास्ताविक मुख्याध्यापक जे. ए. मोरे यांनी केले. सहशिक्षक जे. जी. जाधव यांनी विद्यार्थाना मागदर्शन करून नविन शैक्षणिक वर्षाच्या शुभेच्छा दिल्या. सुत्रसंचालन महेश सूर्यवंशी यांनी तर आभार नितीन राठोड यांनी मानले. इयत्ता १० वी वर्गातील यशस्वी विद्यार्थी नेहा तुकाराम मोरे, पल्लवी मंगेश गायकवाड, प्रतीक बलभीम घोटाळे यांचा प्रशालेच्या वतीने सत्कार करण्यात आला. ८ वी च्या विद्यार्थ्यांना वृक्ष देऊन त्यांचा सत्कार करून शुभेच्छा देण्यात आल्या. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी बिराजदार ए.एस., वडदरे एन.टी., पाटील, ए.एस., साळूंके पी.बी. यांनी परिश्रम घेतले.

## दाबका झेडपी शाळेत नवागत विद्यार्थ्यांची कारमधून मिरवणूक

आरंभ मराठी | उमरगा






उमरगा तालुक्यातील दाबका येथील जिल्हा परिषद प्राथमिक शाळेत शाळेच्या पहिल्या दिवशी नवागत विद्यार्थ्यांचे विविध उपक्रमांद्वारे मोठ्या उत्साहात स्वागत करण्यात आले. याप्रसंगी इयत्ता पहिलीत प्रवेश घेतलेल्या नवागत विद्यार्थ्यांचे कारमध्ये बसवून गावामधून मिरवणूक काढण्यात आली. तसेच या विद्यार्थ्यांच्या पावलांचे ठसे घेऊन ते जतन करण्यात आले. त्याचप्रमाणे पाठ्यपुस्तकांचे व गणवेशाचे वाटप करण्यात आले. त्याचबरोबर खाऊ वाटप करण्यात आले. याप्रसंगी मुख्याध्यापक एस.आर.वैरागकर, बदोले.यु.एस, बिराजदार .व्ही जी, नंदर्गे.के.पी, पवार.आर,डी, पवार. आर.डी, विश्वदत्त पाटील, प्रेम नाथ इंगळे, श्रीम.पल्लवी दत्तात्रय जाधव आदी उपस्थित होते.

## बैलजोडीसह यंत्रानेही पेरणी: पावसाच्या आगमनामुळे बळीराजाने धरली चाड्यावर मूठ

आरंभ मराठी | नारंगवाडी

उमरगा तालुक्यातील नारंगवाडी परिसरात या वर्षी पावसाने १५ मे कीर्तिका नक्षत्रा पासुनच जोर धरला आहे. यामुळे शेतकरीवर्ग चिंतेत आहे. आता मान्सूनच्या पावसाला सुरुवात झाल्याने शेतकऱ्यांनी नारंगवाडी परिसरात पेरणीला सुरुवात केली आहे. नारंगवाडीतील शेतकरी गणेश फुलचंद पवार यांच्या घरी आधुनिक यंत्रणा असतानाही त्यांनी बैलजोडीला कुळव जुंपत पेरणीला सुरुवात केली आहे. बैलांच्या पायात लक्ष्मी असते. त्यामुळे आम्ही बैलजोडीने पेरणी करतो, असे गणेश पवार यांनी सांगितले. तालुक्यातील नारंगवाडी परिसरात बहुतांश शेतीकाम यंत्राच्या साह्याने करण्यात येते. परिसरातील बहुतांश शेतकऱ्यांनी ट्रॅक्टरद्वारे पेरणीपूर्व मशागत केली. त्यामुळे आगामी काळात तिफण, तिफणीवरील वरील चाडे, कमरेला बांधलेली बियाण्यांची पिशवी, तिफण ओढणारी बैलजोडी हे चित्र आगामी काळात दुर्मीळ होणार आहे. खरीप हंगामासाठी शेतकरी पेरणीपूर्व मशागत करून पेरणीची अवजारे, बियाणे,



खतांची जुळवाजुळव करून परंपरागत अवजारे दुरुस्त करण्यासाठी शेतकरी सुताराकडे गर्दी करत असत. परंतु हिच पारंपरिक शेती मशागत तसेच पेरणीसाठी लागणारी अवजारे आता लोप पावण्याचा धोका आहे. बदलत्या काळात कमी वेळेत अधिक काम करण्याचे सूत्र ट्रॅक्टरच्या माध्यमातून होत आहे. ट्रॅक्टरद्वारे शेतीची मशागत व पेरणी करण्याकडे शेतकऱ्यांचा कल शेतीची पारंपरिक अवजारे पडताहेत अडगळीत. शेतकऱ्यांकडील पारंपरिक शेती अवजारे आता अडगळीत जात आहेत. यंत्राद्वारे झटपट कामे होत असल्याने लोखंडी कुळव, कोळपे, नांगर, तिफण अशा अवजारांचा वापर कमी झाला आहे. सध्या बळीराजा पाणी देण्यासाठी स्प्रिंकलर, ठिबक वापरून कमी क्षेत्रात व कमी वेळेत अधिक उत्पन्न घेण्याचा प्रयत्न करत आहे. लहान गावांमध्ये छोट्या शेतकऱ्यांच्या घरांसमोर ट्रॅक्टर दिसून येत आहे. शेतकऱ्यांना वेळेवर खत-बियाणे मिळताना दिसत नाही. त्यासाठी शेतकरी वर्ग त्रस्त दिसत आहे याकडे लोक प्रतिनिधी ,कृषी विभागाने लक्ष्य घालण्याची मागणी शेतकरीवर्ग करत आहे.

## आ. प्रवीण स्वामी व गटशिक्षण अधिकारी राजपूत यांच्या हस्ते नवोदित विद्यार्थ्यांचे स्वागत



आरंभ मराठी | उमरगा

शैक्षणिक वर्ष २०२५ -२६ च्या पहिल्या दिवशी जिल्हा परिषद शाळा कोरेगाव येथे प्रवेशोत्सव साजरा करण्यात आला. यावेळी प्रवेश दिंडी काढण्यात आली. यावेळी उमरगा लोहारा तालुक्याचे आमदार प्रवीण स्वामी व गटशिक्षणाधिकारी अमोल रजपूत यांच्या हस्ते इयत्ता पहिली प्रवेश दिलेल्या नवागतांचे स्वागत करण्यात आले व मोफत गणवेश वाटप, पुस्तक वाटप करण्यात आले. मुख्याध्यापक सूर्यवंशी यांनी शाळेतील उपक्रम व शाळेविषयी माहिती सांगितली. तसेच आमदार प्रवीण स्वामी यांनी आपल्या मनोगतात कोरेगाव शाळेतील त्यांच्या कार्यकाळात राबवलेल्या उपक्रमाविषयी व गावकरी ग्रामस्थ शिक्षक गावातील युवक युती यांच्या मिळालेल्या सहकार्याबद्दल माहिती दिली व नवीन शैक्षणिक वर्षाच्या शुभेच्छा दिल्या. यावेळी व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष, उपाध्यक्ष व सर्व सदस्य आणि पालक यांची उपस्थिती होती. शेवटी बिराजदार ए. बी. आणि कार्यक्रमाचे आभार मानले व कार्यक्रमाची सांगता करण्यात आली.

www.arambhmarathi.com

दैनिक आरंभ मराठी

आपलं धाराशिव.

मंगळवार दि.17 जून 2025

# सातारा जिल्ह्यात पावसाची जोरदार बॅटिंग;कराड-चिपळूण महामार्ग बंद

## कोयना धरणात दोन टीएमसी पाण्याची वाढ

आरंभ मराठी | सातारा

-साताराजिल्ह्याच्या पाणलोट क्षेत्रात सोमवारी पावसाने जोरदार हजेरी लावल्याने जिल्ह्यात पावसामुळे जनजीवन विस्कळीत झाले तर कराड-चिपळूण या राष्ट्रीय महामार्गावरील कोयनानगर येथील वाजेगाव नजीक राष्ट्रीय महामार्ग वाहून गेल्याने कराड-चिपळूण या मार्गावरील वाहतूक पूर्णपणे बंद करण्यात आली. दरम्यान जिल्ह्यातील कोयना,धोम, धोमबलकवडी,उरम ोडी,तारळे,कन्हेर या मध्यम प्रकल्पांच्या पाणलोट क्षेत्रात आज पावसाने जोरदार हजेरी लावली गेल्या २४ तासात कोयनानगर येथे १९९ मिलिमीटर पावसाची नोंद झाली असून २४ तासात कोयना धरणाचा पाणीसाठा तब्बल दोन टीएमसीने वाढला आहे.तर धरणात प्रति सेकंद तब्बल १२ हजार ५३८ क्युसेक पाण्याची आवक होत असल्याने कोयना धरणातील पाणीसाठा २४.१६ झाला आहे. सोमवारी सकाळपासून पावसाने जोरदार हजेरी लावली मुसळधार पडणाऱ्या पावसाने जिल्ह्याच्या पश्चिमेकडील भागांचे जनजीवन पूर्णपणे विस्कळीत झाले धुवॉधार पडलेल्या पावसामुळे नद्यांच्या पाणी पातळीत वाढ झाली आहे. दरम्यान,पावसाचे प्रमाण अधिक असल्याने कराड-चिपळूण महाम ार्गावरील कोयनानगर (वाजेगाव) या ठिकाणी रस्ता वाहून गेला आहे या महामार्गावरील वाहतूक पूर्णपणे बंद करण्यात आली.सध्या या रस्त्याचे काम चालू असून ठेकेदार कंपनीच्या बेजबाबदारपणाचा फटका वाहनधारकांसह सध्या या मार्गावरून प्रवास करणाऱ्या प्रवाशांना बसत आहे. पालकमंत्री शंभूराज देसाई यांनी कंपनीच्या अधिकाऱ्यांसम वेत राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरण विभागाच्या अधिकाऱ्यांची संयुक्त बैठक जिल्हाधिकारी कार्यालय येथे घेतली आली होती यावेळी संबंधित ठेकेदारांना उन्हाळ्यापूर्वी वळण रस्त्यांची कामे पूर्ण करून वाहतुकीसाठी रस्ता दर्जेदार करा सूचना दिल्या होत्या तर संबंधित ठेकेदाराविरुद्ध कारवाई करण्याचा इशाराही पालकमंत्री यांनी दिला



होता मात्र एक महिना उलटूनही संबंधित ठेकेदार कंपनीने या रस्त्याच्या कामात कोणतीही सुधारणा केली नाही तर राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरण कार्यालयाकडे अनेक तक्रारी करूनही कोणतीही दखल घेण्यात आली नाही परिणामी आज वाजेगाव या ठिकाणी पाण्याच्या प्रवाहामुळे रस्ता वाहून गेल्याने पश्चिम महाराष्ट्र व कोकण विभागाशी जोडणारा कराड-चिपळूण राष्ट्रीय महामार्ग वाहतुकीसाठी पूर्णपणे बंद करण्यात आला आहे.दरम्यान, या ठिकाणी मोठ्या पुलाचे काम चालू असून या ठिकाणी येणारे पाणी आडविण्यात आले होते मात्र प्रचंड मोठ्या प्रमाणात रस्त्याच्या बाजूला पाणी साठल्याने रस्ता वाहून गेला आहे. दरम्यानच्या काळात रस्त्यावर कोजिल्ह्यातच पावसाने जोरदार धुमाकूळ घातला सकाळपासून सुरू झालेल्या पावसाने जिल्ह्याचे जनजीवन विस्कळीत केले जिल्ह्याच्या पश्चिमेकडील भागात पावसाने चांगली हजेरी लावली कोयना पाणलोट क्षेत्रात पावसाने दमदार हजेरी लावल्याने

### रस्ता पूर्ववत करण्याचे काम चालू

पश्चिम महाराष्ट्र व कोकण विभागाशी जोडणारा कराड चिपळूण हा महत्त्वाचा मार्ग आहे या मार्गावरील वाहतूक सध्या रस्ता वाहून गेल्याने बंद आहे मात्र हा रस्ता पूर्ववत करण्याचे सूचना संबंधित ठेकेदार कंपनीला देण्यात आल्या असून सध्या हा राष्ट्रीय महामार्ग पूर्वत करण्याचे काम युद्ध पातळीवर सुरू आहे.

### दोनशे मिलिमीटर पावसाची नोंद,

जिल्ह्यातच पावसाने जोरदार धुमाकूळ घातला सकाळपासून सुरू झालेल्या पावसाने जिल्ह्याचे जनजीवन विस्कळीत केले जिल्ह्याच्या पश्चिमेकडील भागात पावसाने चांगली हजेरी लावली कोयना पाणलोट क्षेत्रात पावसाने दमदार हजेरी लावल्याने कोयना पाणलोट क्षेत्रातील कोयनानगर नवजा महाबळेश्वर या ठिकाणी विक्रमी पावसाची नोंद झाली आहे. गेल्या २४ तासात कोयना १९९ मि.मी.नवजा १६७ मि.मी.तर महाबळेश्वर येथे १६० मिलिमीटर पावसाचीनोंदझालीआहे.

कोयना पाणलोट क्षेत्रातील कोयनानगर नवजा महाबळेश्वर या ठिकाणी विक्रमी पावसाची नोंद झाली आहे. गेल्या २४ तासात कोयना १९९ मि.मी.नवजा १६७ मि.मी.तर महाबळेश्वर येथे १६० मिलिमीटर पावसाचीनोंदझालीआहे. तेही वाहन अथवा कोणताही पदाचारी नसल्याने कोणतीही जीवित व वित्तहानी झाली नसल्याचे ठेकेदार कंपनीकडून सांगण्यात आले आहे.

# भूम स्थानकात नवीन बसचे आगमन; भाजपा तालुकाध्यक्ष संतोष सुपेकर यांच्या प्रयत्नांना यश



आरंभ मराठी | भूम

गेल्या अनेक दिवसापासून सातत्याने पाठपुरावा केल्यामुळे भूम आगाराला रविवारी (दि.१५) दोन एस टी बस प्राप्त झाल्या. या नवीन बसची भाजपचे भूम तालुका अध्यक्ष संतोष सुपेकर यांच्या हस्ते पूजा करून चालक वाहकासह बस मार्गस्थ केल्या. रविवारी भूम आगारात दोन नवीन बस आलेल्या आहेत. या बस भूम स्थानकावर येताच प्राथमिक स्वरूपात बसचे पूजन करून , पेढे वाटून वाहक आय बी शेख व चालक सुरेश दिगांबर पवार यांचाही सन्मान करून शुभेच्छा दिल्या. गेल्या अनेक महिन्यात अनेक ठिकाणी बसेस धावत असताना बंद पडून प्रवाशांची गैरसोय झाली होती. एक वेळेस तर चालत्या बसचे चाक निखळले होते, मोठा धोका टळला होता. यामूळे प्रवाशातून तीव्र संताप व्यक्त केला जात होता. गेल्या अनेक वर्षात भूम आगारात नवीन बस आलेल्या नाहीत. जुन्याच बसवर काम चालवले जात होते. बसच्या सततच्या बिघाडामुळे कर्मचा-यांनाही त्रास सहन करावा लागत होता. परिणामी भूम आगारास ईतर आगारा प्रमाणे तात्काळ नवीन बस मिळाव्यात यासाठी भाजपचे तालुका अध्यक्ष अध्यक्ष संतोष सुपेकर , माजी तालुका अध्यक्ष महादेव वडेकर, जिल्हा उपाध्यक्ष सुदाम पाटिल यांनी सातत्याने मुख्यमंत्री, परिवहनमंत्री यांच्याकडे नवीन बस मिळण्यासाठी पाठपुरावा केला होता. अखेर रविवारी २ एसटी बस उपलब्ध झाल्याची माहिती आगार प्रमुख श्रीकांत शंकर सुखसे यांनी दिली. तर आणखी ९ नवीन बसेस मिळण्याची अपेक्षा तालुका अध्यक्ष संतोष सुपेकरसह पदाधिकाऱ्यानी व्यक्त केली आहे. रविवारी भूम ते हैद्राबाद जाण्यासाठी भूम बस स्थानकावर आलेल्या नवीन बसचे पूजन करून, पेढे वाटून, वाहन चालकाचा सत्कार करून बस मार्गस्थ केली. यावेळी वाहक आय बी शेख व चालक सुरेश दिंगाबर पवार यांच्यासह भाजपचे तालुका अध्यक्ष संतोष सुपेकर , प्रकाश शेंडगे , पत्रकार अरविंद शिंदे, भाजपचे धार्मिक आघाडीचे ता. अध्यक्ष योगेश आसलकर, शहर अध्यक्ष बाबा वीर, तालुका प्रसिद्धी प्रमुख शंकर खामकर, उपाध्यक्ष हेमंत देशमुख, व्यापारी विलास जगदाळे, वाहक रोहित टकलेसह प्रवाशी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# धानुरी येथील जिल्हा परिषद शाळेत पहिला दिवस उत्साहाचा

### गर्जा महाराष्ट्र माझा या गाण्याने विद्यार्थ्यांचा प्रवेशोत्सव

### ग्रामपंचायत मार्फत सर्व विद्यार्थ्यांना खाऊ व पुष्पगुच्छ देऊन स्वागत

आरंभ मराठी | लोहारा

लोहारा तालुक्यातील धानुरीच्या जिल्हा परिषदेच्या शाळेत शैक्षणिक वर्षाचा पहिला दिवस प्रवेशोत्सव नावाने उत्साहात साजरा करण्यात आला. सोमवारी (दि.१६) शाळेच्या पहिल्या दिवशी विद्यार्थ्यांना फुले देऊन स्वागत केले. सोमवारपासून शाळा सुरू होत आहेत. शाळेच्या पहिल्याच दिवशी सर्व विद्यार्थ्यांना पाठ्यपुस्तके, गणवेश देण्याचे शिक्षण विभागाने नियोजन केले होते. मुख्याध्यापक व शिक्षकांनी मागील दोन दिवसापासून शाळेवर उपस्थित राहून शालेय परिसराची स्वच्छता, किचन शेड, शौचालय, पिण्याच्या पाण्याच्या टाक्या, वर्ग खोल्या इत्यादी स्वच्छ करून घेतल्या होत्या. तसेच गावातील सरपंच प्रविण थोरात, तंटा मुक्ती अध्यक्ष विनोद साळुंके, सिद्धेश्वर साळुंके, शाळा व्यवस्थापन समिती सदस्य यांना प्रवेशोत्सवाला येण्यासाठी निमंत्रित करण्यात आले होते. पहिल्या दिवशी सर्व विद्यार्थ्यांना मोफत पाठ्यपुस्तकांचे, मोफत गणवेश, बूट सॉक्स मान्यवरांच्या हस्ते वितरण केले गेले. नवागत विद्यार्थ्यांचे पुष्पगुच्छ देऊन



शाळेच्या पहिल्या दिवशी स्वागत करून विद्यार्थ्यांना शालेय पोषण आहारात गोड पदार्थ देण्याच्या सूचना देण्यात आल्या होत्या. एकूणच शाळेच्या पहिल्या दिवशी विद्यार्थ्यांचे उत्साहात स्वागत केले गेले. उत्साहपूर्ण वातावरणात स्वागत करण्यासाठी शिक्षण विभागाने विविध उपक्रमांचे आयोजन केले होते. इयत्ता पहिलीमध्ये प्रवेश घेणाऱ्या विद्यार्थ्यांना मोफत पाठ्यपुस्तके, गणवेश, बूट आणि सॉक्स वितरित करण्यात आले. तसेच ग्रामपंचायत कार्यालय यांनी देखील विद्यार्थ्यांना खाऊ वाटप करून स्वागत करण्यात आले. या वेळी धानुरी नगरीचे सरपंच प्रविण थोरात, तंटामुक्ती अध्यक्ष विनोद साळुंके, सिद्धेश्वर साळुंखे, निजाम मुल्ला, आप्पासाहेब रणखांब सर व सर्व शिक्षक वर्ग व ग्रामस्थ उपस्थित होते.

# जेकेकुरवाडी जिल्हा परिषद शाळेत प्रवेशोत्सवाचा उत्साह

## पहिल्याच दिवशी विद्यार्थ्यांना मोफत गणवेश व पाठ्यपुस्तकाचे वितरण

आरंभ मराठी | उमरगा

उमरगा तालुक्यातील जेकेकुरवाडी येथील जिल्हा परिषद प्राथमिक शाळेत सोमवारी (दि.१६) प्रवेशोत्सव उत्साहात व आनंदी वातावरणात साजरा करण्यात आला. प्रथमतः शालेय परिपाठ झाल्यानंतर गावातून विद्यार्थ्यांची प्रभात फेरीमध्ये आपली मुले - शाळेत पाठवा या घोषणा देऊन फेरी काढण्यात आली. कार्यक्रम ाच्या अध्यक्ष सुमनताई काळे अध्यक्षा शा. व्य. समिती, प्रमुख पाहुणे म्हणून शारदाताई चौधरी उपाध्यक्ष शा. व्य. समिती, सरपंच अनिलभैय्या बिराजदार, बलसूर केंद्राचे केंद्रप्रमुख गोपीचंद पवार, शिक्षणप्रेमी पालक, शाळेचे मु.अ. संजय चालुक्य आदि मान्यवरांच्या हस्ते क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले यांच्या प्रतिमेचे पूजन करण्यात आले. इयत्ता १ ली मध्ये प्रवेशीत झालेल्या सर्व विद्यार्थ्यांचे पुष्पगुछ देऊन स्वागत करण्यात आले. प्रास्ताविकपर शाळेचे मु. अ. संजय चालुक्य यांनी केले. बलसूर केंद्राचे केंद्रप्रमुख गोपीचंद पवार, शाळेतील पदवीधर शिक्षक कृष्णा माळी यांनी सविस्तर मार्गदर्शन केले. सर्व विद्यार्थ्यांना गणवेश




व पाठयपुस्तक वाटप करण्यात आले. सर्वांना गोड खाऊचे वाटप करण्यात आले. शाळेच्या पहिल्याच दिवशी सर्व विद्यार्थाची उपस्थिती होती. याप्रसंगी सरपंच, मु.अ. शा.व्य.समिती अध्यक्ष, उपाध्यक्ष, शिक्षणप्रेमी पालक, अंगणवाडी ताई व शिक्षक वृंद, विद्यार्थी उपस्थित होते.

# जिल्ह्यात डीएपी खताचा तुटवडा, बफर स्टॉक तातडीने खुला करा

## सामाजिक कार्यकर्ते अनिल जगताप यांची मागणी

आरंभ मराठी | धाराशिव




धाराशिव जिल्ह्यात २४९ टन बफर स्टॉक असूनही शेतकऱ्यांना खत मिळत नाही.त्यामुळे बफर स्टॉक तातडीने खुला करून शेतकऱ्यांना मदत करावी अशी मागणी सामाजिक कार्यकर्ते अनिल जगताप यांनी जिल्हाधिकारी कीर्ती किरण पुजार यांच्याकडे निवेदनाद्वारे केली. धाराशिव जिल्ह्यात पेरणीचा हंगाम सुरू असून समाधानकारक पावसामुळे शेतकरी उत्साहात आहेत. मात्र अशा वेळेस जिल्ह्यात डीएपी खताचा तीव्र तुटवडा निर्माण झाल्याने बळीराजावर संकट ओढावले आहे. या पार्श्वभूमीवर शेतकरी नेते अनिल जगताप यांनी जिल्हाधिकारी कीर्ती किरण पुजार यांच्याकडे ईमेलद्वारे निवेदन पाठवून बफर स्टॉकमधील २४९ टन डीएपी खत तातडीने शेतकऱ्यांना वितरित करण्याची मागणी केली आहे.

### मागणी आहे १९८३६ टन; प्रत्यक्षात एकही बॅग नाही

जिल्हा कृषी विभागाने यावर्षी १९८३६ टन डीएपी खताची मागणी शासनाकडे नोंदवली होती. मात्र आंतरराष्ट्रीय बाजारात डीएपीच्या कच्च्या मालाच्या वाढलेल्या किमतीमुळे खत कंपन्यांनी डीएपीचे आयात प्रमाण घटवले आहे. त्यामुळे जिल्ह्यातील शेकडो कृषी केंद्रांवर एकही डीएपी खताची बॅग उपलब्ध नाही. परिणामी, ऐन पेरणीच्या तोंडावर शेतकरी हवालदिल झाला आहे.

### जिल्हा प्रशासनाकडे बफर स्टॉकमध्ये २४९ टन साठा उपलब्ध

सध्या जिल्हा प्रशासनाकडे २४९ टन डीएपी खताचा बफर स्टॉक उपलब्ध आहे. तो तातडीने विक्रीसाठी खुला करण्याची विनंती जगताप यांनी केली आहे. यामुळे शेतकऱ्यांना किमान प्राथमिक दिलासा मिळू शकेल आणि पेरणीची गती कायम राहील.



### तरच बफर स्टॉक खुला होऊ शकतो

बफर स्टॉक खुला करण्यासाठी तालुका स्तरावरील कृषी विभागा कडून आलेल्या मागणीचा विचार करून जिल्हा कृषी विभाग यांनी त्याची शिफारस जिल्हाधिकारी यांच्याकडे करावी लागते व जिल्हाधिकारी यांच्या परवानगीने तो बफर स्टॉक खुल्या बाजारात विक्रीसाठी उपलब्ध करता येऊ शकतो.

### बफर स्टॉक उपलब्ध केल्यास शेतकऱ्यांना मदत होईल



'बफर स्टॉक म्हणजे संकटाच्या वेळी उपयोगात आणण्यासाठी सुरक्षित ठेवलेला साठा. आजची परिस्थिती हीच खरी आपत्तीजन्य आहे. जिल्ह्यातील हजारो शेतकरी खताअभावी पेरणी थांबवण्याच्या स्थितीत आहेत. त्यामुळे जिल्हाधिकारी यांनी तातडीने बफर स्टॉक विक्रीस मंजुरी द्यावी. तसेच शासनाकडे नोंदवलेला १९,८३६ टन डीएपी खताचा साठा तातडीने उपलब्ध व्हावा यासाठीही प्रयत्न व्हावेत.''

अनिल जगताप
सामाजिक कार्यकर्ते

# पहिल्याच दिवशी गणवेशाचे वाटप करून विद्यार्थ्यांचे स्वागत



आरंभ मराठी | बार्शी

बार्शी तालुक्यातील तांबेवाडी येथे जिल्हा परिषद प्राथमिक शाळेत चालू शैक्षणिक वर्ष २०२५ २६ शाळेमध्ये इयत्ता पहिलीत दाखल विद्यार्थ्यांचे पुष्पगुच्छ खाऊ पाठ्यपुस्तके व गणवेश वाटप करून जोरदार स्वागत करण्यात आले. तसेच विद्यार्थ्यांच्या पायाचे ठसे घेऊन पालकांना वाटप करण्यात आले. जि प शाळा तांबेवाडी येथे या चालू शैक्षणिक वर्षापासून इयत्ता पाचवी चा वर्ग जोडण्यात आलेला आहे. या वर्गातील विद्यार्थ्यांचेही शाळा व्यवस्थापन समिती तांबेवाडी व जिल्हा परिषद प्राथमिक शाळा तांबेवाडी यांच्या संयुक्त विद्यमाने पाठ्यपुस्तके गणवेश पुष्पगुच्छ व खाऊ वाटप करून स्वागत करण्यात आले. मोठ्या उत्साहामध्ये चालू शैक्षणिक वर्षाची सुरुवात करण्यात आली. या कार्यक्रमात शाळेचे मुख्याध्यापक जाहांगिर शेख व उपशिक्षक साहेबराव तांबे सर यांनी विद्यार्थ्यांना मोलाचे मार्गदर्शन केले. कार्यक्रमास शालेय व्यवस्थापन समिती तांबेवाडी अध्यक्ष शिवाजी मिंढे, तांबेवाडीचे उपसरपंच पूजा पवार ,विनोद खैरे ,विश्वनाथ साळुंके ,महादेव भोसले ,बिरू चव्हाण दीपक भोसले ,संतोष पवार तसेच गावातील ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.